# महानिर्मिती

*महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित*
२रा माळा, प्रकाशगड, प्रो. अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई -४०० ०५१.
दुरध्वनी क्र.२६४७४२११ / ०२२-२६४७६७५७.

क्र.कासं(मासं)/ **16004** दिनांकः **?1 SEP 20**

## ज्ञापन

चंद्रपूर येथील २ x ५०० मे.वॉ. विस्तार प्रकल्पाच्या पर्यावरण विषयीच्या सुनावणीच्या वेळी तुकुम ते पदमापूर या रस्त्याचा काही भाग महानिर्मितीने बांधून द्यावा अशी मागणी करण्यात आली होती. महानिर्मिती कंपनी वाहतुकीसाठी सदरहू रस्त्याचा वापर करीत असल्याने रस्त्याच्या बांधकामाची जबाबदारी अंशत महानिर्मिती कंपनीवर येते अशा प्रकारची भुमिका सुनावणी वेळी लोकप्रतिनिधींनी घेतली होती. त्यास विचारात घेऊन तुकुम ते पदमापूर (राज्य महामार्ग क्र.२६१, चंद्रपूर ताडोबा रस्ता) या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील ६.५ किमी रस्त्यापैकी २.८५ किमी (अंदाजे) हा तुकुम ते महानिर्मितीच्या मुख्य भांडारगेटपर्यंतचा रस्ता बांधण्यासाठी महानिर्मिती मंजुरी देत आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग संदर्भीय रस्ता सिमेंट-कॉंक्रिटने बांधत असल्याने महानिर्मितीच्या वतीने बांधावयाचा २.८५ कि.मि. रस्ता सिमेंट-कॉंक्रिटने बांधण्यासाठी रू.७/- कोटी इतक्या खर्चास या ज्ञापनाद्वारे मंजुरी देण्यात येत आहे. सांघिक सामाजिक जबाबदारी अंतर्गत खर्च करावयाच्या रू.१०/- कोटी इतक्या निधीतून रू.७/- कोटी इतका निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत करण्यासाठी महानिर्मितीच्या संचालक मंडळाने मान्यता दिली आहे. त्या मान्यतेनुसार हे ज्ञापन निर्गमित करण्यात येत आहे.

२. या मंजुरीच्या अनुषंगाने करावयाच्या पुढील कार्यवाहीकरिता मुख्य महाव्यवस्थापक (प्रकल्प), महानिर्मिती, चंद्रपूर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

(अरविंद चौधरी)
कार्यकारी संचालक(मासं)

प्रतिः

मुख्य महाव्यवस्थापक (प्रकल्प), महानिर्मिती कंपनी, चंद्रपूर.

प्रतः

मुख्य महाव्यवस्थापक (स्थापत्य)-निर्मिती-१, धारावी, मुंबई.
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महानिर्मिती कंपनी, प्रकाशगड, मुंबई.
स्वीय सहायक (संचालक (प्रकल्प), महानिर्मिती कंपनी, प्रकाशगड, मुंबई.
स्वीय सहायक (संचालक(संचलन), महानिर्मिती कंपनी, प्रकाशगड, मुंबई.
स्वीय सहायक (संचालक (वित्त), महानिर्मिती कंपनी, प्रकाशगड, मुंबई.
स्वीय सहायक (कार्यकारी संचालक(प्रकल्प), महानिर्मिती कंपनी, प्रकाशगड, मुंबई.